# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

**फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४० ००१ (महाराष्ट्र राज्य)**

**संकेतस्थळ : www.mafsu.in / www.mafsu.ac.in**

## प्रवेश अधिसुचना - २०२१-२२

## मत्स्य विज्ञान (बी. एफ. एस्सी.) पदवी अभ्यासक्रम

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर मधील मत्स्य विज्ञान (**B.F.Sc.**) पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक सत्र २०२१-२२ च्या प्रवेशाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका व प्रवेश अर्ज **www.mafsu.ac.in** या संकेतस्थळावर **दिनांक ०३/११/२०२१** पासून उपलब्ध राहतील.

**शैक्षणिक पात्रता :**

मत्स्य विज्ञान (बी. एफ. एस्सी.) पदवी प्रवेशाकरीता उमेदवार १२ वी (१०+२) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि इंग्रजी या विषयामध्ये एकत्रीतपणे अराखीव प्रवर्गाकरीता किमान ५०% गुण व राखीव प्रवर्गाकरीता किमान ४०% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक असुन उमेदवाराने राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत घेण्यांत येणारी **MHT-CET २०२१** ही सामाईक प्रवेश परीक्षा दिलेली असणे आवश्यक आहे.

**प्रवेश अर्ज शुल्क :**

प्रवेश अर्ज शुल्क अराखीव प्रवर्गाकरीता रु. १०००/- व राखीव प्रवर्गाकरीता रु ७००/- राहील. उमेदवाराने अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / इंटरनेट बँकींग या द्वारे ऑनलाईन पध्दतीचा वापर करुनच भरावे.

**अर्ज करण्याची कार्यपध्दती :**

- उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने शैक्षणिक पात्रता, प्रवेशाची कार्यपध्दती, आरक्षण, प्रवेश फेरी, वेळापत्रक, इत्यादी करीता माहितीपुस्तीका काळजीपूर्वक वाचल्यानंतर अर्ज भरावा.
- उमेदवाराला ऑनलाईन प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळाद्वारे भरता येईल. ऑनलाईन अर्ज भरण्याची तारीख, प्रवेश शुल्क संबधीची माहिती व अर्ज सादर करण्याबाबतची माहिती उमेदवारांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीपुस्तीकेत देण्यात आलेली आहे.
- प्रमाणपत्राचे एका पेक्षा जास्त पृष्ठ असल्यास (उदा. एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यास २ गुणपत्रीका, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, इ.) त्याची एक PDF किंवा JPEG फाईल करुन अपलोड करावी.
- आवश्यक त्या संपूर्ण माहिती व प्रमाणपत्रांसह ऑनलाईन भरलेला अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत **दिनांक १८/११/२०२१** आहे.

**....२**

**<u>महत्वाच्या सुचना :</u>**

- ऑनलाईन अर्ज भरतांना उमेदवारांनी अपलोड केलेले प्रमाणपत्र स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी.
- उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज केले असल्यास, संपुर्ण माहितीसह नव्याने सादर केलेला अर्ज गुणवत्ता यादी साठी ग्राहय धरला जाईल.
- **प्रमाणपत्रांच्या त्रृटीचे फेर सादरीकरण -** उमेदवारांनी चुकीचे किंवा अपूर्ण दस्तावेज अपलोड केलेले असल्यास अशा उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. या उमेदवारांना विद्यापीठाने निर्दिष्ट केलेल्या विहित तारखेच्या आत केवळ सूचित कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील. तथापि, सदर कागदपत्रांची जारी करण्याची तारीख अर्ज दाखल करण्याच्या अंतिम तारखेपूर्वीची असणे आवश्यक आहे.
- ऑनलाईन अर्जात त्रृटीची पूर्तता करण्याच्या हेतुने दिलेल्या दिनांकानंतर कोणतेही अतिरीक्त प्रमाणपत्र स्विकारण्यात येणार नाही.
- अर्ज करण्यास काही मदत आवश्यक असल्यास संबधीत महाविद्यालयात कार्यालयीन वेळे दरम्यान **दुरध्वनी क्रमांक -** मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर **-९४२०३४९३३५/९८९०२०४८९४** किंवा मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर - **९०१११८९९९०** वर संपर्क करावा.

**दिनांक : ०२/११/२०२१**

**(सचिन कलंत्रे)**
**कुलसचिव**
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
नागपूर